तरुण भारत संवाद

सोमवार, २६ फेब्रुवारी २०२४

# राष्ट्रीय गणित स्पर्धेत शाळांचा लक्षणीय सहभाग

**कोल्हापूर :** केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभाग व तंत्रज्ञान संप्रेषण मंडळ (एनसीएसटीसी), राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, आणि शिवाजी विद्यापीठाचा गणित अधिविभाग यांनी राष्ट्रीय गणित दिनानिमित्त राष्ट्रीय गणित सप्ताह साजरा करण्यात आला. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी मार्गदर्शन केले. शहरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित भित्तीपत्रक स्पर्धेमध्ये ११ शाळांमधील १३ शिक्षकांसह आठवी आणि नववीच्या ३१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पुण्याच्या डॉ. सी. एस. निमकर यांचे विशेष व्याख्यान झाले. डॉ. सी. एस. मांजरेकर, डॉ. पी. जे. पाटील, डॉ. एस. एस. सुतार, डॉ. आसावरी जाधव, डॉ. सी. एस. निमकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यासाठी डॉ. एम. टी. गोफणे, डॉ. के. डी. कुचे, डॉ. जे. पी. खराडे, डॉ. एस. एस. कुंभार, जे. पी. भोसले, डॉ. एस. के. खराडे, एस. डी. थिटे यांनी परिश्रम घेतले.

**विलिंग्डन, विवेकानंद महाविद्यालय**

**शालेय गटात विद्यापीठ हायस्कूल प्रथम**

भित्तीपत्रक स्पर्धेत अनुक्रमे विद्यापीठ हायस्कूल, महाराष्ट्र हायस्कूल, राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल यांनी पारितोषिके मिळवली. निबंध स्पर्धेत विलिंग्डन महाविद्यालय (सांगली), सेमिनार स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय तर प्रश्नमंजुषा स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय यांनी प्रथम तर शिवाजी विद्यापीठ चमूने द्वितीय क्रमांक पटकावला.

पुण्यनगरी
सोमवार, २६ फेब्रुवारी २०२४ | कोल्हा

# 'विवेकानंद'च्या ४८ विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील बी.कॉम. भाग-३ व एम.कॉम भाग-१ व २ मधील ४८ विद्यार्थ्यांची ईपिक कन्सल्टिंग सर्व्हिसेस, पुणे येथे निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना बँकिंग, फायनान्सियल सर्व्हिसेस आणि इन्शुरन्स ट्रेनिंग महाविद्यालयात देण्यात आले होते. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते नियुक्तिपत्रे प्रदान करण्यात आली. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्लेसमेंटसाठी प्रा. एस. पी. थोरात, प्रा. डॉ. संजय लठ्ठे, डॉ. राजश्री पाटील, डॉ. अस्मिता तपासे, प्रा. सनी काळे, प्रा. विजय पुजारी, प्रा. पल्लवी देसाई, प्रा. सतीश चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

26/02/24

27.2.24

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

■ मराठी दैनिक

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

द ग्लोबल टाइम्स

■ Register No. : RNI - MAHAMAR /2012/44621 ■ मुंबई ■ अंक : ४५ ■ वर्ष : १२

Web Site : www.theglobaltime.com ■ सोमवार दि. २६ फेब्रुवारी २०२४ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹ ३.००

# घरगुती ऊर्जा लेखापरीक्षण काळाची गरज : सौ. गार्गी बरगाले



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) च्या गृहविज्ञान विभागाच्यावतीने आयोजित घरगुती ऊर्जा लेखापरीक्षण या विषयावर एनर्जी एज्युकेशन आणि रिसर्च फाउंडेशन इचलकरंजीच्या सीईओ गार्गी बरगाले यांनी मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी ऊर्जेचा उपलब्ध साठा आणि सद्यस्थितीत उपलब्ध ऊर्जा वापरताना घ्यावयाची काळजी याकरिता घरगुती ऊर्जा लेखापरीक्षण करून घेणे आवश्यक आहे असे विचार केले.

याकरिता विद्यार्थिनींना एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशन इचलकरंजी यांच्याकडून घरी वापरात असलेल्या इलेक्ट्रिक वस्तूंची माहिती घेण्याकरिता फॉर्म वितरीत करण्यात आले. त्यातील माहितीनुसार व येणाऱ्या वीज बिलानुसार योग्य ते मार्गदर्शन केले जाणार आहे. ज्यामुळे योग्य इलेक्ट्रिक वस्तूंची निवड करून ऊर्जा बचत करता येईल. कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. ऊर्मिला खोत यांनी केले. श्रीमती सई पाटील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन श्रीमती योगिता पाटील यांनी केले. या कार्यक्रमास गृहशास्त्र विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.